**बबन विश्वनाथ खाडे वि. सुशिला शंकर पवार वगैरे**

**CNR NO.MHSO070000902017**

## आदेश निशाणी क्रमांक १६ वर

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ने विलंब माफ होऊन कैफियत स्विकारण्याबाबत आदेश होऊन मिळण्याकरीता केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे दाखल करुन आक्षेप दर्शविला आहे.

३. प्रतिवादींच्या क्र. १ च्या मते, सदरच्या प्रकरणी महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झल्याने व प्रतिवादी क्र. १ आजारी असल्याने त्यांना हॉस्पीटलमध्ये उपचाराकरिता दाखल केलेले होते. या कारणामुळे प्रतिवादीस कैफियत व म्हणणे वेळेत देता आले नाही. सदरचा झालेला विलंब जाणुनबुजून केलेला नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने विलंब माफ करुन कैफियत स्विकारण्याबाबत आदेश करण्यात येऊन कैफियत दाखल करुन घेण्यात यावी अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादींच्या मते, प्रतिवादीने जाणुनबुजून कैफियत दाखल करण्यास उशीर केलेला आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती करुन वैकल्पिकरित्या न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या मताला आल्यास प्रतिवादींविरुध्द जास्तीत जास्त खर्चाची रक्कम आकरण्यात यावी अशी विनंती केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव होऊन मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला असून, प्रस्तुत दाव्यामध्ये स्थावर मालमत्तेचा समावेश असून, स्थावर मालमत्ते अनुषंगानेच दाद मागितली आहे. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचून पाहिले, तसेच दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी कायदेशीर कालमर्यादिमध्ये म्हणणे दाखल केलेले नाही. प्रस्तुत प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स दिनांक ०३/०८/२०१८ रोजी मिळालेले आहेत. प्रस्तुत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी सदरकामी दि. २३/०८/२०१८ रोजी दाखल झाले.

त्यानंतर दि. २७/०९/२०१८ रोजी दाव्यास कैफियत देण्यासाठी मुदतीचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यानंतर अभिलेखावर कोणत्याही प्रकारचा अर्ज प्रतिवादी नं. १ यांनी दाखल केलेला नाही. सबब निशाण १६ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ च्या म्हणण्याप्रमाणे दाव्यासंदर्भातील महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने तसेच प्रतिवादी क्र. १ हे आजारी असल्याने त्यांना हॉस्पीटलमध्ये उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. त्यामुळे वकिलांची भेट घेवून म्हणणे वेळेत दाखल करता आले नाही. सबब सदरच्या अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ यांनी आजारी असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. विलंबाचे कारण लक्षात घेता अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सबब प्रतिवादी यांना पुरेपुर संधी मिळाली असताना देखील त्यांनी कायदेशीर कालमर्यादेमध्ये प्रस्तुतची कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुत अर्जामधील विलंबाचे कारण वाजवी नाही. परंतु दाव्याचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांस संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादीला प्रस्तुतच्या दाव्याकामी कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये झलेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय योग्य त्या द्रव्यदंडांनी भरुन काढणे गरजेचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु. १५००/– खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम वादींना पुढील तारखेस देण्याची आहे.

०३. प्रतिवादींनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम देण्यास कसूर केले तर प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

०४.दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Ranjana Govind Kumbhar
Date: 2020.02.07 13:59:19 +0530

दिनांकः ०६/०२/२०२० (आर. जी. कुंभार )

ठिकाणः पंढरपूर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| a) Name of the Stenographer | : M. P. Gheradi, Steno(LG) |
| b) Court | :$5^{th}$ Jt.C.J.J.D and J.M.F.C,Pandharpur |
| c) Order signed by P.O. on | : 07/02/2020 |
| d) Order uploaded on | : 07/02/2020 |